| MHRG080000842026 | **दिवाणी चौकशी अर्ज क्र. ९/२०२६**<br>श्री. बलबीर सिंग मोहिंदर सिंग पेलिया व इतर २<br>**विरुध्द**<br>कोणीही नाही. |
|---|---|

## निशाणी क्र. १ खालील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज ते मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून तसा वारस दाखल अर्जदार यांचे नावाने मिळावा याकरिता बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जातील हकीकत थोडक्यात अशी आहे की, अर्जदार क्र.१ याची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ यांची आई कै. सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया ह्या दिनांक २६/०१/२०२४ रोजी त्रीमुर्ती हाउसिंग कॉम्प्लेक्स, सारसन, ता. सारसन, ता. खालापूर, जि. रायगड येथे मयत झालेल्या आहेत. मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांचे कायदेशीर वारस आहेत असे नाममात्र घोषित होवून तसा वारस दाखला अर्जदार यांना देण्यात यावा यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी निशाणी क्र.४ सोबत पुराव्याकामी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामध्ये मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांच्या मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणित प्रती व रेशन कार्डची छायांकित प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार क्र.२ याने पुराव्याचे कामी स्वतःचे नावे निशाणी क्र.११ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यात अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. तसेच निशाणी क्र.१२ वर दैनिक सागर रायगड या वृत्तपत्रात दिनांक २४/०१/२०२६ रोजी नोटीस प्रकाशीत केलेबाबत वर्तमानपत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. अर्जदाराने निशाणी क्र.१३ अन्वये पुरावा बंद पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला आहे.

४. मी अर्जदारांच्या तोंडी पुराव्याचे व उपरोक्त कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले. त्यावरून असे दिसून येते की, दिनांक २४/०१/२०२६ रोजी अर्जदाराने विधिज्ञामार्फत दैनिक सागर रायगड या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. निशाणी क्र.७ वरील बेलीफ अहवालानुसार घोषणापत्राची एक प्रत मयताच्या घरी अर्जदार क्र.१ यांच्या व पंचांच्या समक्ष मयताच्या राहते घरात वावरते घराचे दर्शनीय दारास डकवून प्रसिध्द केलेली आहे. तसेच ग्रुप ग्राम पंचायत साजगांव यांच्या नोटीस बोर्डवर डकवून प्रसिध्द केली आहे. तसेच जाहीरनाम्याची एक प्रत मौजे सारसन येथे सार्वजनिक ठिकाणी डकवून प्रसिद्ध केलेली आहे. तसेच ती जमलेल्या लोकांना वाचून दाखवून त्याची दवंडी देण्यात आलेली आहे. तसेच एक प्रत दिवाणी न्यायालय खालापूर यांच्या नोटिस बोर्डवर डकवून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सर्व कायार्लयाचे माहितगार इसम यांनी त्याची अंमलबजावणी केलेली आहे. मात्र आजतागायत सदर नोटीस संबंधाने कोणीही अर्जास हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदाराने दाखल केलेल्या निशाणी क्र.४ वरील कागदयादी सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया ह्या दिनांक २६/०१/२०२४ रोजी त्रीमुर्ती हाउसिंग कॉम्प्लेक्स, सारसन, ता. सारसन, ता. खालापूर, जि. रायगड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया हे अर्जदार क्र.१ याची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ याची आई होती. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. सदरच्या कथनाच्या पृष्टयर्थ अर्जदार क्र.२ याने त्यांचे स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल केले आहे व त्यामध्ये अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे.

६. अर्जदार यांनी ते मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांचे वारस असल्याबाबत शपथेवर कथन केले आहे. अर्जदार यांनी जाहीर नोटीस प्रकाशित करून देखील कोणीही वारस दाखला देण्यासंबंधाने आक्षेप नोंदविलेला नाही. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांचे ते कायदेशीर वारस आहेत. सदर कथनास देखील आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांच्या कथनांवर अविश्वास ठेवण्यासारखे काही कारण नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांचे वारस असल्याने अर्जदार यांच्या नावे वारस दाखला देण्यास कोणताही अडसर नाही. याकरिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. याव्दारे असे आदेशित करण्यात येते की, अर्जदार क्र.१ श्री. बलबीर सिंग मोहिंदर सिंग पेलिया, अर्जदार क्र.२ श्री. गुरलीन सिंग बलबीर सिंग पेलिया व अर्जदार क्र.३ सौ. तेजिंदरकौर अजित सिंग भुंब्रा हे मयत सरबजीत कौर बलबीर सिंग पेलिया यांचे कायदेशीर वारस असुन त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही व ते फक्त अर्जदार यांना शासकिय व निमशासकीय कामासाठी देण्यात येते आहे.

४. मे. नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फि चा तपशिल द्यावा.

५. सदर प्रमाणपत्र हे दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिष्छेद ३१२ मधील टिपणीस अधिन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्तीपासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पुर्तता करावी.

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.11 16:06:50 +0530

(**डी. एस. खोत** )
सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, खालापूर.

स्थळ – खालापूर
दिनांक – ११/०३/२०२६